पुढारी

# रवळनाथ हौसिंग फायनान्स सहकारातील दीपस्तंभ

## तहसीलदार विकास अहिर : संस्थेच्या रौप्य महोत्सवास सुरुवात

**आजरा : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी आजरासारख्या भागात स्थापन झाली. या संस्थेने आपला नावलौकिक दिल्लीपर्यंत केला आहे. हौसिंग फायनान्समधील मल्टिस्टेट दर्जा मिळवणारी रवळनाथ ही देशातील एकमेव संस्था असून, तिचे कामकाज आदर्शवत असल्याचे प्रतिपादन आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांनी केले.



**आजरा : रवळनाथ हौसिंग फायनान्स को-ऑप संस्थेच्या रौप्य महोत्सव प्रारंभप्रसंगी बोलताना तहसीलदार विकास अहिर. व्यासपीठावर नगराध्यक्ष ज्योत्स्ना चराटी, एम. एल. चौगुले, बालाजी भांगे आदी.**

आजरा येथे रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्य महोत्सव वर्षाच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. रौप्य महोत्सव वर्षाचा प्रारंभ आजऱ्याचे ग्रामदैवत रवळनाथ व गडहिंग्लजचे ग्रामदैवत काळभैरव यांच्या प्रतिमापूजनाने झाली. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. पोलीस निरीक्षक बालाजी भांगे म्हणाले, सध्या अनेक संस्था बुडत आहेत; मात्र सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या विश्वासाच्या भक्कम पायावर रवळनाथ संस्थेची वाटचाल सुरू आहे. यावेळी आजरा नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी यांनीही संस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास अण्णा भाऊ संस्था समूहाचे प्रमुख अशोक चराटी, आजरा अर्बन बँक संचालक डॉ. अनिल देशपांडे, आजरा साखर संचालक दशरथ अमृते, जनता शिक्षण संस्था संचालक दिनेश कुरुणकर यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी उपस्थित होते. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Oct 15, 2020 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

सकाळ

# 'रवळनाथ'वर सभासदांचा विश्वास

## तहसीलदार विकास अहिर; आजरा येथे संस्थेच्या रौप्यमहोत्सवास प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**

आजरा, ता. १४ : एखाद्या संस्थेची स्थापना करून चालवणे हे सोपे असते; मात्र सभासद, ठेवीदारांचा विश्वास संपादन करणे सध्याच्या युगात कठीण आहे. आजऱ्यासारख्या ग्रामीण भागात रवळनाथ को- ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीची स्थापना करून मल्टिस्टेटचा दर्जा प्राप्त केला. हे केवळ विश्वासामुळेच शक्य झाले आहे. हेच या संस्थेच्या पंचवीस वर्षांच्या वाटचालीच्या यशाचे गमक आहे, असे प्रतिपादन आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांनी केले.

येथील रवळनाथ को- ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्यमहोत्सव प्रारंभ कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी, अण्णा भाऊ संस्थेचे प्रमुख अशोक चराटी, डॉ. अनिल देशपांडे, सहायक पोलिस निरीक्षक बालाजी भांगे प्रमुख म्हणून उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, 'संस्थेच्या माध्यमातून आजऱ्याचे नाव दिल्लीपर्यंत नेले आहे. समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या संस्थेकडे २९३ कोटींच्या ठेवी असून या काही दिवसांत संस्था ३०० कोटींच्या ठेवीचा टप्पा ओलांडेल.' सहायक पोलिस निरीक्षक बालाजी भांगे म्हणाले, 'या संस्थेची मला ओळख आहे. पंचवीस वर्षे काटकसर, पारदर्शी कारभार व सभासदांचा विश्वास या बळावर संस्था उभी आहे.' यावेळी नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी यांचे भाषण झाले. यावेळी प्रा. डॉ. रामचंद्र निळपणकर, प्रा. डॉ. विनायक आजगेकर, प्रा. डॉ. एम. पी. पाटील, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे आदी उपस्थित होते. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.




**आजरा : येथील रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या कार्यक्रमात बोलताना विकास अहिर. शेजारी डॉ. एम. एल. चौगुले, ज्योत्स्ना चराटी, बालाजी भांगे, प्रा. व्ही. के. मायदेव आदी.**

Kolhapur, Gadhinglaj-Today
15/10/2020 Page No. 4

लोकमत

# 'रवळनाथ'ची कोविडमध्ये मदत

## विकास अहिर : आजऱ्यात रौप्यमहोत्सवी प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पेरणोली :** कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात प्रशासनाची धांदल उडाली होती. अशा अडचणीच्या काळात रवळनाथ हौसिंग सोसायटीची मोलाची मदत मिळाल्याचे आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांनी सांगितले.



आजरा येथे 'रवळनाथ'च्या रौप्यमहोत्सव कार्यक्रमात नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी यांचा अध्यक्ष एम. एल. चौगुले, सविता चौगुले यांनी सत्कार केला. यावेळी तहसीलदार अहिर, बालाजी भांगे उपस्थित होते.

आजरा येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्यमहोत्सवी वर्षारंभ कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी होत्या.

यावेळी 'रवळनाथ' व 'काळभैरव' प्रतिमेचे पूजन अहिर व पोलीस निरीक्षक बालाजी भांगे यांच्या हस्ते झाले. अहिर म्हणाले, नियोजन चांगले असेल तर कोणतीही संस्था शिखरावर पोहोचते. 'रवळनाथ'ने विश्वासाच्या जोरावर महाराष्ट्र व कर्नाटकात नावलौकिक मिळविला आहे. यावेळी नगराध्यक्षा चराटी, भांगे यांनी मनोगत व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, कोविडसाठी संस्थेने ७२ हजार खर्च केले आहेत. शेअर्ससाठी ४२ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. संस्थेने सामाजिक व शैक्षणिक बांधीलकी संस्थेने जोपासली आहे. याप्रसंगी अण्णा-भाऊ समूहाचे प्रमुख अशोक चराटी, डॉ. अनिल देशपांडे, प्रा. डॉ. शिवशंकर उपासे, दिनेश कुरूणकर, रामचंद्र निळपणकर, नवनाथ शिंदे, किरण पोतदार, व्यवस्थापक शिवानंद घुगरे उपस्थित होते. सागर माने यांनी सूत्रसंचालन, तर उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

# 'रवळनाथ'ची उत्कृष्ट कामगिरी !



आजरा : 'रवळनाथ'च्या रौप्य महोत्सवी वर्षारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलतात तहसीलदार विकास अहिर, शेजारी नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी, एम. एल. चौगुले, बालाजी भांगे, व्ही. के. मायदेव.

प्रतिनिधी

आजरा

आजऱ्यासारख्या छोट्याशा शहरात स्थापन झालेल्या रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीने मल्टीस्टेट दर्जा प्राप्त केला ही कौतुकास्पद गोष्ट आहे. गेली २५ वर्षे सभासदांच्या सेवेत असणाऱ्या या संस्थेने केलेली प्रगती आदर्शवत असून रवळनाथ हे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे गौरवोद्गार आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांनी काढले.

संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षारंभांच्या निमित्ताने आजरा शाखेत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत करून प्रास्ताविकात चौगुले यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला. संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. यानंतर तहसीलदार अहिर, सहाय्यक पोलीस निरिक्षक बालाजी भांगे यांच्या हस्ते ग्रामदैवत रवळनाथ व काळभैरवाचे प्रतिमा पूजन करण्यात आले. सपोनी भांगे म्हणाले, गेली २५ वर्षे ही संस्था कार्यरत आहे. विश्वासार्हता ही या संस्थेची ओळख असून त्यामुळेच संस्थेचा विस्तार झपाट्याने होत असल्याचे त्यांनी सांगितले. यापुढील काळातही संस्थेची प्रगती होवो अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. नगराध्यक्षा चराटी यांनीही संस्थेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमावेळी आण्णा भाऊ संस्थासमूहाचे प्रमुख अशोक चराटी, सूतगिरणीचे उपाध्यक्ष डॉ. अनिल देशपांडे, संस्थेचे संचालक डॉ. शिवशंकर उपासे, डॉ. रामचंद्र निळपणकर, डॉ. विनायक आजगेकर, डॉ. एम. पी. पाटील, डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, डॉ. नवनाथ शिंदे, नंदकुमार शेळके, यांच्यासह उपनगराध्यक्ष विलास नाईक, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे चेअरमन जनार्दन टोपले, के. व्ही. येसणे, दिनेश कुरूणकर आदि उपस्थित होते. सागर माने यांनी सूत्रसंचलन केले तर उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

# रवळनाथ फायनान्सचे काम आदर्शवत

## विकास अहिर : आजऱ्यात रवळनाथचा रौप्यमहोत्सव उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

कुडाळ, ता. १८ : रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा (मल्टी-स्टेट) ही संस्था आजरासारख्या भागात स्थापन झाली. या संस्थेने आपला नावलौकिक दिल्लीपर्यंत केला आहे. हौसिंग फायनान्समधील मल्टिस्टेट दर्जा मिळवणारी रवळनाथ ही देशातील एकमेव संस्था असून, तिचे कामकाज आदर्शवत आहे, असे प्रतिपादन आजऱ्याचे तहसीलदार विकास अहिर यांनी केले.



**आजरा : रवळनाथ सोसायटीच्या कार्यक्रमात बोलताना विकास अहिर. शेजारी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, ज्योत्स्ना चराटी, बालाजी भांगे, प्रा. व्ही. के. मायदेव आदी.**

आजरा येथे रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या रौप्य महोत्सव वर्षाच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. रौप्य महोत्सव वर्षाचा प्रारंभ आजऱ्याचे ग्रामदैवत रवळनाथ व गडहिंग्लजचे ग्रामदैवत काळभैरव यांच्या प्रतिमापूजनाने झाला. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी स्वागत केले.

त्यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमास अण्णा भाऊ संस्था समूहाचे प्रमुख अशोक चराटी, आजरा अर्बन बँक संचालक डॉ. अनिल देशपांडे, आजरा साखर कारखाना संचालक दशरथ अमृते, जनता शिक्षण संस्था संचालक दिनेश कुरुणकर यांच्यासह संस्थेचे संचालक प्रा. डॉ. शिवशंकर उपासे, प्राचार्य डॉ. रामचंद्र निळपणकर, प्रा. डॉ. विनायक आजगेकर, प्रा. डॉ. एस. पी. पाटील, प्रा. डॉ. किरण पोतदार, प्रदीप अभ्यंकर, प्रा. डॉ. नवनाथ शिंदे, नंदकुमार शेळके (सीए), सौ. सविता चौगुले, सौ. श्रद्धा निळपणकर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व संस्थांचे प्रतिनिधी, पदाधिकारी, सभासद ठेवीदार, हितचिंतक सर्वांनी रौप्य महोत्सव निमित्त शुभेच्छा व सदिच्छा भेट दिली. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

### यशस्वी वाटचाल

पोलिस निरीक्षक बालाजी भांगे म्हणाले, 'सध्या अनेक संस्था बुडत आहेत; मात्र सभासद ठेवीदार व कर्जदार यांच्या विश्वासाच्या भक्कम पायावर रवळनाथ संस्थेची वाटचाल सुरू आहे.' यावेळी आजरा नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी यांनीही संस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.